# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक २१/०५/२०२४ (मंगळवार) दुपार

---

### घरफोडीचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस केले अटक

पोस्टे काटोल अंतर्गत सुभाष चौक काटोल येथे दिनांक २०/०५/२०२४ रोजी यातील फिर्यादी नामे— सौ. मनिशा योगेश्वर भांगे, वय ४५ वर्ष, रा. सुभाष ता. काटोल हिचे पती सकाळी ०३/०० वा. झोपेत असताना यातील **आरोपी नामे — अमित प्रकाश नवरंग, रा. धनगरपुरा पेठबुधवार काटोल** याने फिर्यादीचे घरचे वरच्या माळयावर येवुन दाराची कडी काढुन रूम मध्ये आत प्रवेश करून चोरी करण्याचा उद्‌देशाने आला आहे असे फिर्यादी ला दिसुन आले. फिर्यादीने तात्काळ डायल ११२ वर कॉल केला काटोल पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन आरोपीस ताब्यात घेतले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, सफौ धनराज भुक्ते, पोहवा रितेश मारसेट्टीवार, पोशि सचिन डायलकर यांनी पार पाडली.

### धान्य चोरी करणाऱ्या आरोपीस नागपूर ग्रामीण पोलीसांनी केले अटक

पोस्टे बोरी अंतर्गत दिनांक ०३/०३/२०२४ चे ००.०० वा. ते दिनांक ०४/०३/२०२४ चे ६.३० वा. पुर्वी दरम्यान फिर्यादी विनोद महादेव निमकर, वय ४२ वर्ष, रा. सोनेगाव बोरी जि. नागपूर यांचे सोनेगाव बोरी येथील शेतातील मकानमध्ये ठेवलेले १० क्विंटल तूर व ०३ क्विंटल गहु कोणीतरी अज्ञात आरोपीने सदरचा मुद्‌देमाल ठेवलेल्या ताला तोडुन आत प्रवेश करून चोरून नेले आहे. अशा फिर्यादीच्या रीपोर्ट वरून पोस्टे बोरी येथे अप क्र. २२०/२४ कलम ४६१, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर आरोपीचा शोध बोरी पोलीस घेत असता गोपनीय माहिती व तांत्रिक तपासाद्वारे **आरोपी नामे**— सुनिल रेखीराम रॉय वय ३४ वर्षे रा. चिखला पो. बादलपुर कुरई शिवनी मध्यप्रदेश यास पारडी नागपूर येथून ताब्यात घेतले. आरोपी कडुन २२ क्विंटल चना किंमती ७०,०००/—रू., ०३ क्विंटल गहु किंमती ६०००/—रू., १० क्विंटल तुर किंमती ६६,०००/—रू. गुन्हयात वापरलेली बोलेरो पिकअप क्र. एम एच—२९/बी ई—२१३५ किंमती ३,५०,०००/—रू., असा एकुण ४,९२,०००/—रू. चा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बोरी येथील ठाणेदार हृदयनारायण यादव, सफौ ढवराळ, डीबी पथकातील पोहवा आशिष टेकाम, पोहवा युनुस खान, कुणाल पारधी, पोशि आशिष कछवा यांनी पार पाडली.


पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर